# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१३/०८/२०२४

**<u>प्रेसनोट</u>**

अवयवदानाच्या महत्वाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि अवयवदानाबददलच्या गैरसमजांची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १३ ऑगस्ट **'भारतीय अवयवदान दिन'** साजरा केला जातो. या कार्यक्रमाचे मुख्य उददीष्टय लोकांना अधिक जीव वाचवण्यासाठी मृत्यूनंतर अवयव दान करण्याच्या महतव बददल प्रोत्साहित करणे आणि शिक्षित करणे हे आहे. **'आज कोणाच्या तरी हसण्याचे कारण व्हा.'** हे आजच्या दिनाचे घोषवाक्य आहे.

या दिनाचे औचित्य साधून वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत विविध कार्यक्रम करण्यात आले.

- रुग्णालये व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रूग्णांना जागतिक अवयव दानाचे महत्व पटवून देणे. व मृत्यूनंतर तसेच जिवंतपणी दात्यांना कोणकोणते अवयव दान करू शकतो याबददल माहिती देण्यात आली.
- सायकल व बाईक रॅली काढून बॅनरच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.
- शाळा व कॉलेज ठिकठिकाणी अवयव दान करण्याकरीता शपथ करण्यात आली.

➢ दान करता येणाऱ्या अवयवाची यादी-

- जिवंत दात्याद्वारे दान करता येणारे अवयव -
  एक किडनी, एक फुफुस, यकृताचा एक भाग, स्वादुपिंडाचा एक भाग, आतडयाचा एक भाग
- दात्याचा मृत्यू झाल्यानंतर दान करता येणारे अवयव-
  मुत्रपिंड (२), यकृत, फुफुस, हदय, स्वादुपिंड, आतडे

➢ अवयव दानासाठी पात्र-

- सर्व वयोगटातील लोक संभाव्य देणगीदार आहेत. जेवव्हा एखादी व्यकती मरण पावते तेव्हा त्यांचा वैद्यकीय इतिहास आणि वय दात्याची योग्यता ठरविण्यासाठी वापरली जाते.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका